# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः27.06.2026** **वारःशनिवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी सेशेल्सच्या 'राष्ट्रीय दिना'च्या सुवर्णमहोत्सवी सोहळ्याला उपस्थित राहणार
2. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडून नशामुक्त भारतासाठी सविस्तर कृती आराखडा सादर
3. सहकारी तत्त्वावर आधारित देशातल्या पहिल्या टॅक्सी सेवेचा, म्हणजेच 'भारत टॅक्सी'चा आज गांधीनगर इथं केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांच्या हस्ते प्रारंभ
4. कल्पकम इथं हायड्रोजन निर्मिती प्रकल्पाचं उद्घाटन आणि
5. व्हेनेझुएलामध्ये झालेल्या दोन शक्तिशाली भूकंपांतील मृतांची संख्या 920 वर, भारताकडून मदतीसाठी बचाव पथक आणि साहित्य रवाना

**<u>पंतप्रधान-सेशेल्स दौरा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी सेशेल्सच्या 'राष्ट्रीय दिना'च्या सुवर्णमहोत्सवी सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्यासाठी सेशेल्सच्या तीन दिवसांच्या अधिकृत दौऱ्यावर आज सकाळी रवाना होत आहेत. पंतप्रधानांनी यापूर्वी 2015 मध्ये सेशेल्सला भेट दिली होती. या सोहळ्यात भारतीय संरक्षण दलाचं एक पथक आणि नौदलाची दोन जहाजं सहभागी होणार असल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं एका निवेदनात म्हटलं आहे. या दौऱ्यादरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी सेशेल्सचे राष्ट्राध्यक्ष डॉक्टर पॅट्रिक हर्मिनी यांच्याशी द्विपक्षीय सहकार्याच्या विविध मुद्द्यांवर चर्चा करतील.

**<u>नशामुक्त भारत</u>**

भारताला 2029 पर्यंत नशामुक्त करण्याचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठीचा सविस्तर कृती आराखडा काल केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मांडला. ते काल नवी दिल्लीत नार्को समन्वय केंद्राच्या दहाव्या बैठकीला संबोधित करत होते. विविध संबंधित घटकांशी सखोल चर्चा करून तयार केलेल्या अंमली पदार्थ नियंत्रण दृष्टिकोन दस्तऐवज 2026-2029चं अनावरणही त्यांनी केलं. अंमली पदार्थांचा विळखा हा राष्ट्रीय सुरक्षा, सामाजिक स्थैर्य, आर्थिक हितसंबंध आणि तरुण पिढी तसंच देशाच्या भविष्यासाठी धोकादायक असल्याचं शहा यांनी यावेळी नमूद केलं. गेल्या 12 वर्षांत 1 कोटी 18 लाख किलोग्रॅम अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. ही आकडेवारी अंमली पदार्थांच्या तस्करीविरुद्ध सरकारची मोहीम सातत्याने प्रगती करत असल्याचं दर्शवत आहे, असं शहा यावेळी म्हणाले. अंमली पदार्थांच्या व्यसनाचं आव्हान साऱ्या जगाला भेडसावत असून या समस्येविरुद्ध एकत्रित लढा देण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केलं. गृहमंत्र्यांनी या बैठकीत 'अंमली पदार्थ विल्हेवाट पंधरवडा' उपक्रमाचाही प्रारंभ केला. याअंतर्गत जप्त केलेल्या दोन लाख नऊ हजार पाचशे किलोग्रॅमहून अधिक अमली पदार्थांची विल्हेवाट लावली जाणार आहे.

**<u>भारत टॅक्सी- अमित शाह</u>**

सहकारी तत्त्वावर आधारित देशातल्या पहिल्या टॅक्सी सेवेचा, म्हणजेच 'भारत टॅक्सी'चा प्रारंभ आज गुजरातमध्ये गांधीनगर इथं केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते होणार आहे. अमित शाह गुजरातच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर असून, विविध कार्यक्रमांना हजर राहणार आहेत. अमूल, इफको आणि नाबार्ड यांसारख्या आठ प्रमुख सहकारी संस्थांच्या सहकार्यानं ही शून्य दलाली तत्त्वावर चालणारी सेवा विकसित करण्यात आली आहे. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये प्राथमिक तत्त्वावर तिची सुरुवात करण्यात आली होती. आतापर्यंत या प्लॅटफॉर्मवर केवळ गुजरातमध्येच 1.5 लाखांहून अधिक चालक आणि सात लाख ग्राहकांची नोंदणी झाली असून, दररोज 3500 हून अधिक फेऱ्या पूर्ण केल्या जात आहेत. आता ही सेवा

अहमदाबाद, सुरत आणि वडोदरासह 14 प्रमुख शहरांमध्ये सुरू करण्यात येणार असून, एका महिन्याच्या आत संपूर्ण राज्यात विस्तारित करण्याचं उद्दिष्ट आहे.

**हायड्रोजन निर्मिती प्रकल्प**

जगातील पहिल्या कॉपर-क्लोरीन थर्मोकेमिकल प्रक्रियेवर आधारित हायड्रोजन निर्मिती प्रकल्पाचं उद्घाटन काल कल्पक्कम इथं भारताच्या अणुऊर्जा विभागाचे सचिव अजित कुमार मोहंती यांच्या हस्ते झालं. कल्पक्कम इथल्या इंदिरा गांधी सेंटर फॉर ॲटॉमिक रिसर्च'मध्येहा प्रकल्प उभारण्यात आला आहे. मुंबईतल्या भाभा अणुउर्जा संशोधन केंद्रानं स्वदेशी तंत्रज्ञानानं विकसित केलेल्या कॉपर-क्लोरीन थर्मोकेमिकल प्रक्रियेद्वारे अणुऊर्जेचा वापर करून हायड्रोजन निर्मितीची पडताळणी करण्यासाठी, हा प्रकल्प एक 'तंत्रज्ञान प्रात्यक्षिक' म्हणून उभारण्यात आला आहे. अणु-प्रक्रिया उष्णतेचा हायड्रोजन निर्मितीशी केलेला यशस्वी मेळ ही एक महत्त्वपूर्ण तांत्रिक प्रगती असून, यामुळे प्रगत अणु-रिॲक्टर्सचा वापर करून मोठ्या प्रमाणावर कार्बन-मुक्त हायड्रोजन निर्मितीचा आशादायक मार्ग खुला झाला आहे, असंही यावेळी मोहंती यांनी नमूद केलं.

**व्हेनेझुएला**

व्हेनेझुएलामध्ये दोन शक्तिशाली भूकंपांमुळे मृतांची संख्या 920 वर पोहोचली आहे. यात सुमारे 3300 लोक जखमी झाले आहेत. व्हेनेझुएलाच्या राजधानीजवळ 7 पूर्णांक 2 दशांश रिख्टर स्केल तीव्रतेच्या पहिल्या भूकंपानंतर काही सेकंदातच 7 पूर्णांक 5 दशांश तीव्रतेचा अधिक शक्तिशाली भूकंप झाला. व्हेनेझुएलाचे हंगामी राष्ट्राध्यक्ष डेल्सी रॉड्रिग्ज यांनी आणीबाणी जाहीर केली आहे. दरम्यान, व्हेनेझुएलाला मदत करण्यासाठी भारतानं ऑपरेशन अमिस्तादची घोषणा केली असून, या मोहिमेअंतर्गत, भारतीय वायुसेनेची दोन 'सीसी-17' विमानं काल व्हेनेझुएलाकडे रवाना झाली. यात 41 सदस्यांचं बचाव पथक आणि 35 टनांहून अधिक मदत साहित्य, औषधे आणि वैद्यकीय उपकरणांचा समावेश आहे. मृतांच्या कुटुंबियांप्रती भारतानं शोक व्यक्त केला असून व्हेनेझुएला सरकारच्या आणि जनतेच्या पाठीशी भारत खंबीरपणे उभा असल्याचं म्हटलं आहे.

**पीयूष गोयल**

भारत आणि ब्रिटन यांच्यातील सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार करारामुळं दोन्ही देशांतील संबंध एका महत्त्वपूर्ण टप्प्याकडं वाटचाल करत असल्याचं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल यांनी म्हटलं आहे. लंडनमध्ये आयोजित व्यावसायिक अधिवेशनात ते काल बोलत होते. या व्यापार करारामुळं विकासाची नवीन क्षितिजं खुली होत असून, दोन्ही देशांमधील उद्योगांना परस्पर सहकार्य अधिक दृढ करण्याचं, नावीन्यपूर्ण उपक्रमांना गती देण्याचं आणि अधिक गुंतवणूक करण्याचं आवाहन त्यांनी केलं.

**अमेरिका-इराण संघर्ष**

होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये एका मालवाहू जहाजावर इराणनं केलेल्या ड्रोन हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून अमेरिकेनं इराणवर हल्ले केले आहेत. व्हाईट हाऊसमध्ये पत्रकारांशी बोलताना अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी, इराणनं युद्धविराम कराराचे उल्लंघन केल्यास त्याचे परिणाम काय होतील, हे लवकरच समजेल, असं म्हटल्यानंतर काही वेळातच हे हल्ले झाले. दरम्यान, दोन्ही देशांमध्ये वाद कमी करणारं शिष्टमंडळ स्थापन करण्याचा निर्णय अमेरिका आणि इराणनं घेतला असून, यात इराणच्या रिव्होल्युशनरी गार्ड आणि अमेरिकेच्या लष्कराच्या सेंट्रल कमांड या पथकातले अधिकारी असतील, अशी माहिती अमेरिकेचे उपाध्यक्ष जे डी व्हान्स यांनी दिली आहे.

**ग्रामीण विकास परिषद**

नवी दिल्ली इथं उद्यापासून दोन दिवसीय'राष्ट्रीय ग्रामीण विकास परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या परिषदेत सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांचे ग्रामीण विकास मंत्री, वरिष्ठ सरकारी अधिकारी आणि तज्ज्ञ सहभागी होणार असून, यात सर्वसमावेशक ग्रामीण विकासावर चर्चा, प्रमुख योजनांचा आढावा आणि ग्रामीण भारताच्या विकासाचा भविष्यातील आराखडा तयार करण्यावर भर दिला जाणार आहे.

**फिफा विश्वचषक फुटबॉल**

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत गट 1 मध्ये काल झालेल्या सामन्यात फ्रान्सनं नॉर्वेचा 4-1 असा पराभव केला, तर याच गटात सेनेगलनं इराकचा 5-0 असा पराभव केला. दरम्यान, इक्वाडोर, आयव्हरीकोस्ट, नेदर्रलँड, आणि तुर्किये यांनी या स्पर्धेत आपापले सामने जिंकले आहेत.

**क्रिकेट-टी 20**

आयर्लंडमध्ये बेलफास्ट इथं काल झालेल्या पुरुषांच्या टी-ट्वेंटी क्रिकेट सामन्यात आयर्लंडनं भारताचा 34 धावांनी पराभव केला. आयर्लंडचा भारतावर कोणत्याही प्रकारच्या क्रिकेटमध्ये हा पहिलाच विजय आहे. प्रथम फलंदाजी करताना आयर्लंडनं निर्धारित 20 षटकांत 9 बाद 182 धावा केल्या, तर भारताचा डाव 18 षटकं आणि 5 चेंडूत 148 धावांत आटोपला. 28 धावांत 3 बळी घेणारा मॅथ्यू हॉलार्ड 'सामनावीर' ठरला. या मालिकेतला दुसरा आणि अंतिम सामना उद्या खेळला जाईल.

**FIH हॉकी**

लंडन इथं काल झालेल्या 'एफआयएच पुरुष प्रो लीग हॉकी' सामन्यात भारतानं पाकिस्तानचा 7-1 असा धुव्वा उडवला. पाकिस्तानला सुरुवातीला आघाडी मिळाल्यानंतर, भारतानं सात वेगवेगळ्या खेळाडूंच्या गोलसह शानदार पुनरागमन केलं. आता उद्या भारताचा सामना इंग्लंडशी होणार आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.